वर्ष : ०५ | अंक: १७ | मुंबई, मंगळवार १९ मार्च २०१९ ते २५ मार्च २०१९ | पृष्ठ: ४

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

WeWite: www.policebatmipatra.com
www.policebatmipatra.in

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 दोघींच्या लढतीत यंदा कोण बाजी मारणार ?

3 → लोकशाहीचा उत्सव

एटीएममधून आता कार्डशिवाय काढा पैसे ← 4

# शिवसेनेला उमेदवारी दिल्यास भाजपमध्ये बंड?




केंद्रातील सत्ताधारी भाजपची पालघरातील लोकसभेची विद्यमान जागा शिवसेनेला सोडून भाजप कार्यकर्त्यांना वाऱ्यावर सोडल्यास कमळ चिन्ह नसेल तरी बेहत्तर आपण लोकसभेची निवडणूक अपक्ष लढणार असल्याचे भाजपच्या आदिवासी आघाडीच्या प्रसिद्धी प्रमुखांनी बंड करत जाहीर केल्याने पालघरमध्ये युतीत पुन्हा खळबळ उडाली आहे. पालघर लोकसभा मतदारसंघ भाजप-शिवसेनेच्या युतीत वाटाघाटीत शिवसेनेकडे गेल्याचे जवळपास निश्चित झाले आहे. यामुळे ही जागा भाजपलाच द्या, अशी भावना अजूनही जिल्ह्यातील भाजप कार्यकर्त्यांची आहे. यासंदर्भात गेला महिनाभर राजीनामासत्र सुरूच आहे.

**पालघर-** असे असतानाच आता भाजप प्रदेश अदिवासी आघाडीचे प्रसिद्धीप्रमुख लुईस काकड यांनी थेट भाजप प्रदेशाध्यक्ष रावसाहेब दानवे यांनाच पत्र दिले आहे. या पत्रात 'जिल्ह्यात भाजप वाढविण्यासाठी आम्ही जीवाचे रान केले आहे, अशा वेळी लोकसभेला कमळ चिन्ह नसेल तर मी अपक्ष लढणार, असा इशाराच दिला आहे.' त्यामुळे जिल्ह्यातील भाजप-शिवसेनेमधील दुरी अधोरेखित होत आहे. यामुळे युतीतील बेबनाव अद्यापही सुरूच असल्याचे स्पष्ट चित्र दिसत आहे.

भाजप व शिवसेनेच्या युतीआधी १९८०पासून पालघर लोकसभा ही जागा भाजपकडेच आहे. आठ महिन्यांपूर्वी झालेल्या पोटनिवडणुकीत स्वतंत्र लढूनही भाजपने बालेकिल्ला राखला होता, मात्र या लोकसभेला युतीच्या वाटाघाटीत ही जागा शिवसेनेला दिल्याचे जवळपास निश्चित असून तशा हालचाली दिसत आहेत, इतकेच नव्हे तर भाजप राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा व शिवसेना नेते उद्धव ठाकरे यांच्या वाटाघाटीवेळी अमित शहा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ही जागा शिवसेनेला देऊन टाकण्याचे जाहीरही केले.

अमित शहा यांच्या निर्णयामुळे भाजपच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी राजीनामे देऊन नाराजी उघड केली होती. यामुळे ही नाराजी दूर करण्यास भाजपच्या वरिष्ठ ांना कितपत यश येईल, हे गुलदस्त्यातच असताना तलासरी तालुक्यातील करजगाव येथील भाजपचे सरपंच आणि आदिवासी आघाडीचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख लुईस काकड यांनी बंड पुकारले आहे. काकड यांनी घेतलेल्या या निर्णयामुळे युतीला मोठा फटका बसू शकतो. पालघर युतीचे समन्वयक म्हणून सार्वजनिक बांधकाम मंत्री एकनाथ शिंदे आणि राज्यमंत्री रवींद्र चव्हाण यांची नियुक्ती केल्याचे कळते आहे.

लोकसभा पुनर्रचनेपूर्वीपासून या भागात राम नाईक यांच्या रूपाने भाजपचे वर्चस्व राहिले होते. त्यांच्यासोबत दिवंगत खासदार चिंतामण वनगा यांनी तलासरी भागातील सीपीएमशी एक हाती झुंज देत विक्रमगड, जव्हार, मोखाडा भागात पक्षाच्या बळकटीसाठी संपूर्ण आयुष्य वेचले होते. मात्र १९ फेब्रुवारी २००८ ला पालघर लोकसभा हा स्वतंत्र मतदारसंघ घोषित झाल्यानंतर २००९मध्ये झालेल्या पहिल्या निवडणुकीत बहुजन विकास आघाडीच्या बळीराम जाधव यांनी भाजपच्या चिंतामण वनगा यांचा १२ हजार मतांनी पराभव केला होता. २०१४च्या लोकसभा निवडणुकीत चिंतामण वनगा यांनी पाच लाख ३३ हजारांहून मते मिळवत बविआच्या बळीराम जाधव यांचा २ लाख ३९ हजार पराभव केला होता.




# होळीत सावधान !

## रासायनिक रंगामुळे डोळ्यांना धोका

**मुंबई - होळीत वापरल्या जाणाऱ्या रासायनिक रंगामध्ये वाळू, काच, पावडर, शिसे यासह इतरही घातक पदार्थ असतात. ते डोळ्यात गेल्याने दरवर्षी २० हून अधिक जणांच्या डोळ्यांवर परिणाम होतो. मेडिकल, मेयो, डागा या तीन शासकीय रुग्णालयांत या काळात अशाप्रकारे सुमारे २० ते ३० तर खासगी रुग्णालयात याहून दुप्पट रुग्ण उपचारासाठी येत असल्याचे नेत्ररोग तज्ज्ञांचे म्हणणे आहे.**

देशभरात होळीचा सण उत्साहात साजरा केला जातो. उत्तर प्रदेशानंतर महाराष्ट्रात होळीत रंग खेळणाऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे. फुग्यांमध्ये रंग भरून ते नागरिकांवर भिरकावण्याचे प्रकार या काळात हमखास होतात. त्यामुळे काहींच्या डोळ्याला इजा होते. वर्षभरात देशातील सर्व शासकीय व खासगी रुग्णालयात डोळ्यात



रासायनिक पदार्थ गेल्यामुळे येणाऱ्या रुग्णांपैकी तब्बल १८ टक्के रुग्ण हे केवळ होळीचा रंग डोळ्यात गेल्यामुळे जखमी झालेले असतात. रुग्णांची ही संख्या केवळ होळीच्या दोन दिवसांतील आहे. मेडिकल, मेयो, डागा या तीन शासकीय रुग्णालयांत गेल्या होळीत डोळ्यात रंग गेलेले सुमारे ३० रुग्ण उपचाराकरिता आले. पैकी ७ रुग्ण हे गंभीर गटातील होते. त्यातील चौघांच्या दृष्टीवर परिणाम झाला. शहराच्या खासगी रुग्णालयात याहून जास्त रुग्ण उपचाराकरिता येतात, परंतु तेथील नोंदी ठेवल्या जात नसल्याने अचूक आकडेवारी पुढे येत नाही.

### डोळ्यांसाठी धोकादायक

- रंगातील चमकणारे पदार्थ डोळ्यात गेल्यास बुब्बुळ जखमी होऊ शकतो
- रंगाचे फुगे डोळ्यावर लागल्यास जखम होऊ शकते
- लेन्स लागलेल्या बुब्बुळावर फुगे लागल्यास ते सरकू शकते
- रंगात दूषित पाणी वापरल्यास त्यामुळे डोळ्यात जंतू पसरू शकतात
- ओल्या फरशीवरून पडल्यास डोळ्याला इजा होऊ शकते

# भुमाफियांचा भाईंदरकरांचे मैदान हडप करण्याचा डाव



मैदानासाठी आरक्षित असलेला भुखंड भुमाफीयांनी बळकवल्याचा संतापजनक प्रकार भाईंदर मध्ये उघडकीस आला आहे.

या विरोधात स्थानिक रहिवाशांनी आवाज उठवूनही अधिकाऱ्यांना हाताशी धरुन हि जागा बळकवण्यासाठी मैदानात मोठमोठे सिमेंटचे खांब उभे करण्यात आले. याची गंभीर दखल शिवसेना या राजकीय पक्षासोबत सोशल राईट्स फाऊंडेशन , आवाज फाऊंडेशन अशा अनेक संघटनांनी घेतली व आंदोलनाचा इशारा दिला आहे.

भाईंदर पूर्व येथे सरस्वती नगर स्थित गुरुद्वाराजवळ मिरा भाईंदर महानगरपालिकेने मैदानासाठी एक भुखंड आरक्षित केला आहे. यावर पालिकेने अर्धवट अवस्थेत मैदान विकसित केले आहे. हे मैदान


उर्वरित पृष्ठ 2 वर



# गोव्याचे मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर यांचे निधन

## वयाच्या ६३ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

**पणजी-** गोव्याचे ४ वेळा मुख्यमंत्री व संरक्षणमंत्रिपद भूषवलेले भाजपचे ज्येष्ठ नेते मनोहर पर्रीकर यांचे रविवारी निधन झाले. ते स्वादुपिंडाच्या कर्करोगाने आजारी होते. सोमवारी सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. २००१ मध्ये त्यांची पत्नी मेधा यांचेही कर्करोगाने निधन झाले होते. २०१८ मध्ये निदान झाल्यानंतर न्यूयॉर्कपर्यंत उपचारांचे प्रयत्न झाले. परंतु डॉक्टरांना यश आले नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पर्रीकरांच्या निधनाने कधीही भरून न येणारे नुकसान झाल्याचे सांगत सोमवारी राष्ट्रीय दुखवटा जाहीर केला. पर्रीकर हे देशातील पहिले आयआयटीयन मुख्यमंत्री होते. १३ डिसेंबर १९५५ रोजी मनोहर पर्रिकर यांचा गोव्यातील मापुसा येथे जन्म झाला. मागीओ येथील लोयोला हायस्कूलमध्ये त्यांनी शिक्षण घेतले. त्यांचे माध्यमिक शिक्षण मराठी भाषेतूनच झाले. पुढे १९७८ साली त्यांनी आयआयटी मुंबई येथून इंजिनिअरिंगचे शिक्षण पूर्ण केले. आयआयटी शिक्षित मनोहर पर्रिकर हे भारतातील पहिले आमदार होते. मनोहर पर्रिकर यांनी सुरूवातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघात काम केले. तरूण वयातच ते संघात मुख्य शिक्षक बनले. पुढे राजकारणात त्यांनी भाजपमधून प्रवेश घेतला. १९९४ साली पहिल्यांदा पर्रिकर गोवा विधानसभेत आमदार म्हणून निवडूण



गेले. जून १९९९ ते नोव्हेंबर १९९९ या काळात गोव्यात त्यांनी विरोधी पक्षनेते म्हणून काम केले. त्यानंतर २४ ऑक्टोबर २००० रोजी मनोहर पर्रिकर पहिल्यांदा गोव्याचे मुख्यमंत्री झाले. पुढे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी मोठा कालावधी गोव्यात घालवला. २०१४ साली केंद्रात भाजपचं सरकार आल्यानंतर मनोहर पर्रिकर हे देशाचे संरक्षणमंत्री झाले.

# तीन करोड किमतीचे इफेड्रीन हे अंमली पदार्थ जप्त

**भाईंदर - इफेड्रीन या अंमली पदार्थाचा २५ किलोचा साठा ठाणे ग्रामीण पोलिसांनी जप्त करत मुंबईतील कापड दुकानदारासह रिक्षाचालकाला अटक केली आहे. या अंमली पदार्थाची किंमत ३ कोटी रुपये असून ड्रग्जतस्करीच्या या रॅकेटच्या मूळापर्यंत शोध घेतला जाईल, अशी माहिती ठाणे ग्रामीणचे अधीक्षक शिवाजी राठोड यांनी दिली.**




योगेश रमणलाल शहा (५०) आणि सादेव वैजनाथ जमादार (३८) अशी या आरोपींची नावे आहेत. दोघेही कांदिवली भागात राहत असून शुक्रवारी दोघेही रात्री ठाणे ग्रामीणच्या हद्दीतील बंटास हॉटेलच्या येथे इफेड्रीन घेऊन येणार असल्याची माहिती सहाय्यक पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांना मिळाली होती. त्यानुसार पोलिस रात्रीपासूनच आरोपींच्या मागावर होते. हॉटेलसमोरील रस्त्यावर सापळा लावून आरोपींची प्रतीक्षा करणाऱ्या पोलिसांना पहाटे ५ वाजता आरोपींना पकडण्यात यश आले. वरिष्ठ पोलिस निरीक्षक राम भालसिंग यांच्या पथकाने सापळा लावून रिक्षातून आलेल्या योगेश आणि सादेव या दोघांना पोलिसांनी घेराव घालून पकडले. यावेळी त्यांच्याकडून इफेड्रीन या अंमली पदार्थांचा २५ किलोचा साठा हस्तगत करण्यात आला असून याप्रकरणी नवघर पोलिस ठाण्यात गुन्हा

उर्वरित पृष्ठ 2 वर

# मतदानाच्या आधी ४८ तासात कोणत्याही पक्षाने जाहिरनामे सादर करु नयेत

निवडणुक आयोगाने शनिवार दि.१६.३.२०१९ रोजी एक नवा नियम राजकिय पक्षांसाठी जारी केलाय. कोणताही राजकीय पक्षाला त्यांचा जाहीरनामा प्रत्यक्ष मतदानांच्या ४८ तास अगोदर मांडता येणार आहे. मतदाना पुर्वी काही तास अगोदर प्रचार थंडावतो, मतदारांवर कोणताही प्रकारचा दबाव असु नये यासाठी हा नियम गेल्या काही निवडणुकी दरम्यान पाळण्यात येत आहे. याच नियमाचा एक भाग म्हणुन कुठल्याही टप्प्यात निवडणुक असली तरी त्याच्या आधी



४८ तास राजकीय पक्षांनी जाहीरनामे सादर करु नयेत. अश्या अर्थाच पत्र निवडणुक आयोगाने शनिवारी सगळया

उर्वरित पृष्ठ 2 वर



# दोघींच्या लढतीत यंदा कोण बाजी मारणार?

**मुंबई-** कुर्ला, वांद्रे ते विलेपार्ले असा संमिश्र वस्तीचा उत्तर मध्य मुंबई मतदारसंघ काँग्रेसचा पारंपरिक बालेकिल्ला मानला जायचा. गेल्या निवडणुकीत भाजपच्या पूनम महाजन यांनी धाडस केले आणि मोदी लाटेत त्या निवडून आल्या. काँग्रेसने पुन्हा एकदा प्रिया दत्त यांनाच रिंगणात उतरविल्याने चुरस वाढली असून, महाजन आणि दत्त या दोघींमधील लढतीत यंदा कोण बाजी मारते याची उत्सुकता असेल. उत्तर मध्य मुंबई मतदारसंघाचा काही भाग पूर्वी वायव्य मुंबई मतदारसंघात येत असे. सुनील दत्त यांनी या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले होते. त्यांच्या पश्चात त्यांची



कन्या प्रिया दत्त या दोनदा निवडून आल्या. मतदारसंघाची रचना लक्षात घेता हा मतदारसंघ तसा काँग्रेसला अनुकूल, पण गेल्या निवडणुकीत चित्र बदलले. मोदी लाटेत सारेच बालेकिल्ले खालसा झाले व त्यात या मतदारसंघाचा समावेश होता. पूनम महाजन या निवडून आल्या. प्रमोद महाजन यांची कन्या म्हणून त्यांना वेगळे वलय होते. निवडून आल्यावर त्यांची भारतीय जनता युवा मोर्चाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाल्याने त्यांना राष्ट्रीय पातळीवर काम करण्याची संधी मिळाली. यंदा पूनम महाजन यांचा मतदारसंघ बदलणार अशी सुरुवातीला चर्चा होती, पण त्यांनाच पुन्हा या मतदारसंघातून संधी दिली जाणार आहे. यामुळे पूनम महाजन आणि प्रिया दत्त या दोन माजी केंद्रीय मंत्र्यांच्या कन्यांमध्येच सामना रंगणार आहे.


गेल्या निवडणुकीत प्रिया दत्त यांचा १ लाख ८७ हजारांहून अधिक मतांनी पराभव करून पूनम महाजन यांनी मोदी यांच्या लाटेत बाजी मारली. त्यावेळी भाजपची पाळेमुळे या मतदारसंघात रुजलेली नव्हती. मात्र त्यानंतर झालेली विधानसभा व महापालिका निवडणुकीत संघटनेची मतदान केंद्र पातळीपर्यंत नीट बांधणी करण्यात आली. मोदी लाटेचा प्रभाव या वेळी फारसा राहिलेला नाही. पण महाजन यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करून मतदारसंघातील काही प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न केला आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे मातोश्री निवासस्थान त्यांच्या मतदारसंघात असून महाजन-ठाकरे घराण्याच्या कौटुंबिक संबंधांमुळे शिवसेना-भाजप युतीचा लाभ त्यांना मिळू शकेल. या मतदारसंघात वांद्रे-कुला संकुल, वांद्रे, पवई व अन्य ठिकाणी उच्चभ्रू वस्तीही आहे आणि वांद्रे, कालिना, चांदिवली, कुर्ला आदी परिसरात झोपडपट्ट्यांचे साम्राज्यही आहे. वांद्रे येथील मोठी शासकीय वसाहत, कालिना येथे एअर इंडिया कॉलनी, तर कुर्ला व अन्य ठिकाणी शासनाकडून कब्जेहक्काने दिल्या गेलेल्या जमिनींवर बांधण्यात आलेल्या अनेक मोठ्या सोसायट्याही आहेत. बीकेसी संकुलात प्रचंड आर्थिक उलाढाल



असलेल्या व्यावसायिक आस्थापना आहेत. संमिश्र स्वरूपाच्या या मतदारसंघात सुमारे १६ लाख मतदारांपैकी सुमारे पाच लाख मराठी भाषिक, पाच लाखांच्या आसपास मुस्लीम, सुमारे दोन लाख ७० हजार उत्तर भारतीय, गुजराती/राजस्थानी सुमारे दीड लाख, ख्रिश्चन सुमारे एक लाख १० हजार आणि दक्षिण भारतीय व अन्य जातीधर्मांचे उर्वरित मतदार आहेत. अयोध्येतील राममंदिर, मुस्लीम समाजात तोंडी तलाक देण्याविरोधातील कायदा आदी महत्त्वाच्या मुद्द्यांमुळे मुस्लीम मतांचे ध्रुवीकरण होण्याची शक्यता आहे.

# होळीतील मनमानीने तरुणी, महिला बेजार

**मुंबई-** रोष विसरून एकमेकांना रंगांत न्हाऊ घालणारा सण, अशी होळीची ओळख! मात्र, तरी अनेक ठिकाणी जबरदस्तीने रंग लावणे, पैसे उकळणे, घरात-पाणी टाकणे अशा किळसवाण्या पद्धतींचा शिरकाव झालेला दिसतो. त्यामुळे अनेक तरुणी आणि महिलांना होळी आणि होळीपूर्वीचा आठवडा अगदी नकोसा होऊन जातो. होळी, धुळवडीच्या दिवशी रस्त्यावर येता-जाता फुग्यांचा, पाण्याचा मारा तर होतोच. परंतु, अनेक चाळी, वस्त्या, सोसायट्यांमध्ये होळीच्या आठवडाभर आधीच रंग, फुगे, पाणी टाकण्याचे प्रकार सुरू होतात. त्यामुळे शाळा-महाविद्यालयांत किंवा कार्यालयात जाणे कठीण होऊन बसते. होळीच्या दिवशी अनेक तरुण मुली घरात राहणेही टाळतात. शक्य झाल्यास एक दिवस घर बंद करून बाहेरगावी जातात. चित्रपटगृहात किंवा मॉलमध्ये जाऊन वेळ घालवतात. मोठ्या सोसायट्यांमध्येही हे चित्र दिसते. दक्षिण, मध्य मुंबईतीलच नव्हे तर उपनगरांतील चाळकऱ्यांसाठीही हे नवीन नाही. कोकणात शिमगा मोठा धूमधडाक्यात साजरा होतो. घरोघर खेळे



किंवा नाचे पारंपरिक नृत्य करून बक्षीस मिळवतात. पण मुंबईच्या काही वस्त्यांमध्ये चित्रपट गीतांवर ओंगळ नृत्य करून नंतर स्वतच ठरवलेली रक्कम प्रत्येक घरात जाऊन मागण्याची नवीनच 'प्रथा' निर्माण झाली आहे. 'ही रक्कम १०० पासून ५०० रुपयांपर्यंत कितीही असते. एवढी रक्कम आम्ही का द्यायची, असे कुणी विचारले तर त्यावर घरातल्या कमावत्या व्यक्तींचे दाखले देऊन तुम्हाला काय कमी आहे, म्हणून ऐकवले जाते. पैसे देणार नसाल, तर रंग खेळायला घराबाहेर या, असे फर्मावले जाते. तरीही बधले नाही की दरवाजावर रंग ओतणे, दार उघडे दिसले तर घरातील ज्या तरुण मुलांना रंग लावून घ्यायचा नसतो त्यांनाही ओढून घराबाहेर आणणे आणि रंग फासणे, असे प्रकार घडतात. त्यामुळे होळीचा अलीकडे बेरंगच होऊ लागला आहे,' असा अनुभव दादरच्या आगर बाजारमधील एका चाळीतील तरुणीने सांगितला. हुल्लडबाजी करणारे शेजारीच आहेत. त्यांचा रोष नको म्हणून स्वत:चे नाव उघड करण्यासही ती बिचकत होती.

मनाविरुद्ध रंग लावणे, फुगे मारणे हे एखाद्याला मानहानीकारक वाटू शकते, हे आपल्याला कधी कळणार असा प्रश्न एका तरुणीने केला. सहा वर्षांपूर्वी मुंबईत राहायला आल्यापासून होळीच्या दिवशी बाहेर जाऊन चित्रपट पाहणे, हाच तिचा शिरस्ता झाला आहे. होळीतील मनमानीने अनेक मुंबईकर बेजार झाले आहेत.

# आर्थिक दुर्बलांचे १० टक्के आरक्षणही घटनाबाह्य!

**मुंबई-** आरक्षणासाठीची ५० टक्के मर्यादा घटनेच्या मूळ संरचनेचा भाग नाही. परंतु ती तशी असेल तर केंद्र सरकारने आर्थिक मागासांसाठी दिलेले १० टक्के आरक्षणही घटनाबाह्य म्हणावे लागेल. शिवाय भविष्यातही कुठलेच आरक्षण देता येणार नाही, असा दावा मराठा आरक्षण समर्थकांतर्फे गुरुवारी उच्च न्यायालयात करण्यात आला.

राज्य सरकारने आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडून मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण देण्यात काहीच चूक नाही, असा दावाही याचिकाकर्त्यांतर्फे करण्यात आला. मराठा आरक्षणाबाबतच्या याचिकांवर न्या. रणजित मोरे आणि न्या. भारती डांगरे यांच्या खंडपीठासमोर नियमित सुनावणी सुरू आहे. मराठा आरक्षणाच्या समर्थनार्थ हस्तक्षेप याचिका करणाऱ्या अ‍ॅड. वैभव कदम यांच्यावतीने ज्येष्ठ वकील रफीक दादा यांनी गुरुवारच्या सुनावणीत युक्तिवाद केला. मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण देऊन राज्य सरकारने आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली आहे. ही मर्यादा ओलांडून राज्य सरकारने घटनेच्या मूळ संरचनेला आणि समानतेच्या तत्त्वालाच धक्का पोहोचवला असल्याचा दावा आरक्षणाला विरोध करणाऱ्या याचिकाकर्त्यांनी केला होता. रफीक




दादा यांनी याचिकाकर्त्यांच्या या आरोपाचे खंडन करताना आरक्षणाची ५० टक्के मर्यादा ही घटनेच्या मूळ संरचनेचा भाग नाही हे न्यायालयाला पटवून देण्याचा प्रयत्न केला. आरक्षणाची मर्यादा किती असावी याबाबत घटनेत कुठेही उल्लेख नाही. बालाजी निकालामध्ये सर्वोच्च न्यायालयाने सर्वप्रथम आरक्षणाच्या टक्केवारीबाबत नमूद केले. त्यानंतर इंदिरा साहनी प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने अपवादात्मक परिस्थिती वगळता आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांवर जाऊ नये, असे स्पष्ट केले. याचाच अर्थ ५० टक्क्यांची मर्यादा ही घटनेचा भाग नाही आणि ती ओलांडता येऊ शकते, हे स्पष्ट झालेले आहे. ही मर्यादा घटनेचा भाग असती आणि ओलांडली गेली असती तर ते उल्लंघन ठरले असते. त्याचा परिणाम १०३व्या घटनादुरुस्तीवरही होईल. १०३व्या घटनादुरुस्तीने आर्थिकदृष्ट्या मागासांना १० टक्के आरक्षण दिले आहे. तेही ५० टक्क्यांची मर्यादा बंधनकारक असेल तर घटनाबाह्य ठरेल. परंतु परिस्थिती तशी नाही. त्यामुळेच राज्य सरकारचा मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय चुकीचा म्हणता येणार नाही, असा दावा दादा यांनी केला. विसंगती नष्ट करण्यासाठी घटनेत समानतेचे तत्त्व समाविष्ट करण्यात आले. त्याचवेळी जे समान नाहीत, त्यांच्यासाठी आरक्षणही देण्याची तरतूद करण्यात आली.

# भिवंडीमध्ये कचराकुंडीत सापडली ३५० आधार कार्ड

**मुंबई-** भिवंडीतील अजयनगर परिसरातील एका कचराकुंडीत ३५० आधार कार्ड सापडल्याने एकच खळबळ माजली आहे. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर हा प्रकार घडल्याने प्रशासनाने त्वरीत याची दखल घेतली आहे. जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर यांनी याबाबत भिवंडी उपविभागीय अधिकाऱ्यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. निवडणुकांमध्ये व इतर ठिकाणी आधार कार्डचा गैरप्रकार होण्याचा मोठा धोका असतो. ऐन निवडणुकीच्या तोंडावर इतक्या मोठ्या प्रमाणात आधारकार्ड आढळून आल्याने हा प्रशासनाचा गलथानपणा की एखाद्या बनावट आधार कार्ड बनवणाऱ्या टोळीचा हा प्रकार आहे, याचा तपास घेतला जात आहे. याप्रकरणी आता उपविभागीय अधिकारी मोहन नळदकर यांच्याकडून चौकशी सुरु आहे.

# मच्छीमारांचे पुनर्वसन कोण करणार?

**मुंबई-** सागरी किनारा मार्गासारखा (कोस्टल रोड) मोठा आणि महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवताना त्यामुळे प्रभावित होणाऱ्या ७००हून अधिक मच्छीमारांच्या पुनर्वसनाचा विचार करावासा वाटला नाही का? सरकारच्या अनास्थेचा



फटका या मच्छीमारांनी का सहन करावा? अशी प्रश्नांची सरबत्ती करत उच्च न्यायालयाने बुधवारी राज्य शासनाला धारेवर धरले. तसेच प्रकल्पामुळे प्रभावित होणाऱ्या मच्छीमारांच्या पुनर्वसनासाठी, त्यांच्या उपजीविकेसाठी कोणती पर्यायी योजना आहे हे स्पष्ट करण्याचे आदेशही न्यायालयाने सरकारला दिले आहेत.

गेल्या सुनावणीच्या वेळी प्रकल्पाच्या कामाला स्थगिती देण्यास नकार देतानाच या प्रकल्पाविरोधात न्यायालयात धाव घेणाऱ्या वरळी कोळीवाडा नाखवा आणि वरळी मच्छीमार सवरेदय सहकार सोसायटी या दोन संस्थांचे म्हणणे ऐकून घेण्याचे तसेच प्रकल्पाचे काम सुरू होईपर्यंत मच्छीमारांना किनाऱ्यालगत जाळी लावून मासेमारी करू देण्याचे तोंडी आदेश न्यायालयाने दिले होते.

बुधवारच्या सुनावणीत सरकारी वकील पूर्णिमा कंथारिया यांनी या दोन संस्थांसोबत झालेल्या बैठकीचा तपशील न्यायालयात सादर केला. हा तपशील वाचल्यानंतर सरकारने एवढा मोठा प्रकल्प राबवताना त्यामुळे प्रभावित होणाऱ्या ७०० हून अधिक मच्छीमारांच्या पुनर्वसनाचा विचारच केलेला नसल्याकडे मुख्य न्यायमूर्ती नरेश पाटील आणि न्यायमूर्ती नितीन जामदार यांच्या खंडपीठाने लक्ष वेधले. तसेच सरकारच्या भूमिकेबाबत नाराजी व्यक्त केली. त्याच वेळी प्रकल्पामुळे प्रभावित होणाऱ्या मच्छीमारांच्या पुनर्वसनाचे काय? त्यांना कोणत्या प्रकारची मदत सरकारतर्फे केली जाणार आहे? अशी विचारणा करताना मोठा आणि महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेताना त्यामुळे प्रभावित होणाऱ्यांचे पुनर्वसन करण्याची जबाबदारीही सरकारची असल्याचे न्यायालयाने सुनावले.

# उत्सवी दणदणाटावरून राज्य सरकार-पोलिसांची खरडपट्टी

**मुंबई-** उत्सवी दणदणाटाला आळा घालण्याबाबत न्यायालयाचे आदेश आणि कायद्याची अंमलबजावणी करण्याची सरकार आणि पोलिसांची इच्छाच नाही, अशा शब्दांत उच्च न्यायालयाने मंगळवारी सरकार आणि पोलीस यंत्रणेच्या भूमिकेवर ताशेरे ओढले. एवढेच नव्हे, तर मुंबईच्या पोलीस आयुक्तांनी केलेले प्रतिज्ञापत्रही स्वीकारण्यास न्यायालयाने स्पष्ट नकार दिला. कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल, अशी सबब पुढे करत ध्वनी प्रदूषण नियम धाब्यावर बसवणाऱ्यांवर कारवाई केली नसल्याच्या पोलिसांच्या भूमिकेचा न्यायालयाने मागील सुनावणीच्या वेळी



खरपूस समाचार घेतला होता. तसेच कायदा-सुव्यवस्थेची घडी नीट बसवण्याची जबाबदारी असलेले पोलीस धार्मिक भावना दुखावतील आणि कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल ही सबब देऊन ध्वनी प्रदूषण करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत हतबलता व्यक्तच कशी करतात, असा संतप्त सवालही न्यायालयाने उपस्थित केला होता. पोलिसांच्या भूमिकेबाबत विशेषत: कारवाई न करण्याबाबत पोलीस आयुक्तांनीच आता प्रतिज्ञापत्राद्वारे स्पष्टीकरण द्यावे. एवढेच नव्हे, तर कारवाई न करणाऱ्या पोलिसांवर काय बडगा उगारणार याबाबतही खुलासा करावा, असे न्यायालयाने बजावले होते.


# लाद्यांच्या भाराने पूल कोसळला?

**मुंबई-** 'स्वच्छ भारत अभियाना'च्या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस परिसराचे सुशोभीकरण करताना हिमालय पुलावर बसविण्यात आलेल्या



आकर्षक लाद्यांमुळे भार वाढला आणि हा भार सोसण्यास असमर्थ ठरलेला पूल गुरुवारी कोसळल्याचा संशय पालिकेतील काही अधिकारीच व्यक्त करू लागले आहेत. त्यामुळे या प्रकरणाला नवे वळण मिळण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. 'स्वच्छ भारत अभियान'साठी देशभरातील मोठ्या शहरांमधील ठरावीक पर्यटनस्थळांची निवड करण्यात आली होती. या स्पर्धेसाठी मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस परिसराची निवड झाली होती. या परिसरातील हिमालय पुलाचे सुशोभीकरण, पदपथांची दुरुस्ती, इमारती एकसमान दिसाव्या यादृष्टीने रंगरंगोटी करण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला होता. हिमालय पूल आकर्षक दिसावा यासाठी त्यावरील लाद्या बदलण्याचे आणि पुलाची रंगरंगोटी करण्याचे निश्चित करण्यात आले. त्यानुसार पुलावर आकर्षक अशा लाद्या बसविण्यात आल्या. या कामासाठी सुमारे १४ लाख रुपये खर्च करण्यात आले. लाद्या बसविताना विशेष काळजी घेण्याची गरज होती. मात्र तसे न झाल्यामुळे पुलावरील भार वाढला. कालांतराने हा भार सोसणे पुलाला शक्य झाले नाही आणि तो गुरुवारी कोसळला, असे पालिकेतील काही अधिकाऱ्यांनी आपले नाव जाहीर न करण्याच्या अटीवर सांगितले. संरचनात्मक तपासणीमध्ये ही बाब तांत्रिक सल्लागाराच्या लक्षात यायला हवी होती. मात्र या बाबीकडे दुर्लक्ष झाल्याचे या अधिकाऱ्याने नमूद केले.

# धारावी पुनर्विकासाला निवडणुकीनंतरचा मुहूर्त



**मुंबई- २६ हजार कोटी रुपयांच्या 'धारावी पुनर्विकास प्रकल्पा'साठी मुख्य सचिवांच्या समितीने 'सेकलिंक' या दुबईस्थित कंपनीची निवड निश्चित केली असली, तरी याबाबत अद्याप अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्याआधी या योजनेच्या विकासकाची नियुक्ती करून सामंजस्य करार करण्याचा शासनाचा प्रयत्न होता.**

परंतु 'सेकलिंक' या कंपनीला झोपडपट्टी पुनर्विकासाचा अनुभव नसल्याचा मुद्दा पुढे आल्याने तूर्तास नियुक्ती लांबल्याची चर्चा आहे. याबाबत अधिकृत दुजोरा मिळू शकला नाही.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी धारावी पुनर्विकासाचा मुद्दा सुरुवातीपासूनच लावून धरला आहे. कोणत्याही परिस्थितीत आपल्या कारकीर्दीतच धारावी पुनर्विकासाला सुरुवात व्हावी, असा त्यांचा प्रयत्न आहे. त्यामुळे जागतिक पातळीवर निविदा प्रक्रिया फसल्यावरही त्यातील त्रुटींचा विचार करून 'विशेष हेतू कंपनी' स्थापन करण्याचे निश्चित करण्यात आले. या कंपनीच्या माध्यमातून शासनाची २० टक्के भागीदारी निश्चित करण्यात आली. ३१५० कोटी रुपये आणू शकणाऱ्या विकासकाची निवड करण्याचा निर्णय घेण्यात आला. या कंपनीसाठी अनेक सवलतीही देऊ करण्यात आल्या. त्यामुळे शासनाला काही हजार कोटींचा तोटा सहन करावा लागणार आहे. तरीही या निविदा प्रक्रियेला फक्त दोन कंपन्यांचा प्रतिसाद मिळाला. सेकलिंक कंपनीने ७५०० तर अदानी इन्फ्रा लि.ने ४५०० कोटींची निविदा सादर केली. त्यामुळे उच्चतम दराची निविदा म्हणून सेकलिंक कंपनीची निवड मुख्य सचिवांच्या समितीने केली. मात्र या कंपनीला झोपडपट्टी पुनर्विकासाचा अजिबात अनुभव नसल्याची बाब आता पुढे आली आहे.

मुख्य सचिवांच्या समितीने सेकलिंकची निविदा मान्यतेसाठी मुख्यमंत्र्यांकडे पाठविली आहे. याबाबत मुख्यमंत्रीच अधिकृत घोषणा करणार होते. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्याच्या आधी सामंजस्य करार केला जाणार होता.

पृष्ठ १ वरुन

## तीन करोड किंमतीचे इफेड्रीन हे अंमली पदार्थ जप्त

दाखल करण्यात आला आहे. या अंमली पदार्थांची तीन कोटी रुपये किंमत असल्याचे पोलिस अधीक्षक शिवाजी राठोड यांनी सांगितले.


इफेड्रीनच्या तस्करीमागे योगेश हाच मुख्य आरोपी असून रिक्षातून अंमली पदार्थांची वाहतूक करण्यासाठी त्याचा रिक्षाचालक साथीदार सादेव मदत करत होता. आरोपींनी हे अंमली पदार्थ कांदिवलीवरून आणले असून मागील दीड वर्षापासून शिल्लक राहिलेले इफेड्रीन घरात ठेवले होते, असे योगेश याचे म्हणणे असल्याची माहिती पोलिस अधीक्षकांनी दिली. त्याचे कांदिवलीत कपड्याचे दुकान असून त्याच्याविरुद्ध सन २०१४-२०१५ या वर्षात अंमली पदार्थ संदर्भात एक गुन्हाही दाखल असल्याचे अधीक्षकांनी सांगितले.

## मतदानाच्या आधी ४८ तासात कोणत्याही पक्षाने जाहिरनामे सादर करु नयेत

पक्षाना पाठवला. पूर्वीच्याच नियमाचा हा भाग आहे. हे स्पष्ट करत आयोगाने अश्याप्रकारे आश्वासने देणारे जाहीर नामे प्रचाराचा काळ संपल्यानंतर जाहीर करु नये असे सांगितले आहे. हा आचार संहितेचा एक भाग आहे.

## भुमाफियांचा भाईंदरकरांचे मैदान हडप करण्याचा डाव

विकसित करण्यापूर्वी या ठिकाणी कचरा , दारुच्या , बियरच्या बाटल्या , मेलेली जनावरे असा कचरा वेगवेगळया ठिकाणाहून आणून टाकला जात असे. त्यामुळे या मैदानाचा डंपींग ग्राऊंड म्हणून वापर होत असे. यावेळी शिवसेनेने पालिकेकडे सतत पाठपूरावा करु न सदर डंपींग ग्राऊंड बंद केले. पण अजुनही रात्री या मैदानावर अनेक गैरकृत्ये पाहण्यास



मिळतात. स्थानिक रहिवाशांना या मैदानावर फेरफटका मारण्यास सुरक्षित अशी ही जागा नाही. याच मैदानावर गरीब घरातील मुले मुली विविध खेळांचा सराव करताना दिसतात. पण त्यातच दुचाकीस्वारांचे स्टंट ही इथे पहायला मिळतात. आणि आता तर या मैदानात भुमाफीयांनी सिमेंटचे खांब रातोरात उभे केले आहेत. हे मैदान बळकवण्याचा प्रयत्न करणाऱ्या भुमाफियांनी हि जागा आपल्या नावे असल्याचा दावा केला आहे. दरम्यान शिवसेना तसेच सोशल राईट्स फाउंडेशन च्या माध्यमातून आंदोलनाचा इशारा देताच पालिका आयुक्त



बालाजी खतगावकर यांनी सदरचे खांब तात्काळ काढा असे आदेश अतिक्रमण विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत. जागा मालकांपैकी जागेचा मोबदला कोणाचा राहीला असेल तर तो त्याला देण्यात येईल असे पालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता दिपक खांबीत यांनी स्पष्ट केले.

# मुंबईकरांच्या अतिसहनशीलतेमुळेच पालिका बेफिकीर!

**मुंबई-** दर वर्षी पावसाळ्यात मुंबईतील रस्त्यांची खड्ड्यांमुळे चाळणी होते आणि ती होऊ नये यासाठी काय उपाययोजना करायला हव्यात याची पालिकेला जाणीवही आहे. मात्र मुंबईकर सगळे सहन करतात. ते हेही सहन करतील हे माहीत असल्यानेच पालिकेकडून रस्त्यांची देखभाल केली जात नाही. मुंबईकरांच्या या अतिसहनशील वृत्तीमुळेच पालिका याबाबत बेफिकीर असल्याच्या कानपिचक्या उच्च न्यायालयाने गुरुवारी पालिकेला दिल्या. पावसाळ्यात



खड्ड्यांमुळे रस्त्यांची चाळणी होत असून लोकांना त्यामुळे जीवही गमवावा लागत असल्याबाबत उच्च न्यायालयाच्या एका न्यायमूर्तीनी मुख्य न्यायमूर्तींना पत्रव्यवहार करून या प्रकरणी स्वत:हून जनहित याचिका दाखल करून घेण्याची विनंती केली होती. २०१३मध्ये ही याचिका दाखल करून घेत न्यायालयाने पालिका, राज्य सरकारसह महत्त्वाच्या यंत्रणांना खड्डे बुजवण्याबाबत आदेश दिले होते. त्यानंतर वारंवार आदेश देण्यात आले. परिस्थिती सुधारण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना केल्या जात असल्याची हमी देऊनही परिस्थितीत काहीही बदल झालेला नाही, असा आरोप गुरुवारी झालेल्या सुनावणीच्या वेळी करण्यात आला.

मुख्य न्यायमूर्ती नरेश पाटील आणि न्यायमूर्ती नितीन जामदार यांच्या खंडपीठानेही त्याची गंभीर दखल घेतली. तसेच पालिकेसह अन्य संबंधित यंत्रणेने आदेशांची अंमलबजावणी केल्याचे दिसत नसल्याकडे लक्ष वेधले. सगळ्याच यंत्रणा या समस्येप्रति असंवेदनशील असल्याचे दिसून येत असल्याचे ताशेरे ओढले. चांगले रस्ते उपलब्ध करणे हे पालिकेचे कर्तव्य आहे. परंतु पावसाळ्यात रस्त्यांची काय स्थिती असते आणि ती सुधारण्यासाठी काय उपाययोजना करायला हव्यात हे पालिकेला माहीत नाही असे नाही.

# संपादकीय... लोकशाहीचा उत्सव



संपादकः- दिपक मोरेश्वर नाईक

जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीप्रधान देशातील लोकशाहीचा उत्सव म्हणून लोकसभा निवडणुकीकडे पाहिले जाते आणि सतराव्या लोकसभेसाठीच्या तारखा जाहीर झाल्यामुळे खऱ्या अर्थाने या उत्सवाला प्रारंभ झाला आहे. इथून पुढचे अडीच महिने काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत या उत्सवाची धूम असेल. ११ एप्रिलपासून १९ मे पर्यंत सात टप्प्यांमध्ये मतदान होणार असून २३ मे रोजी मतमोजणी होऊन सत्तेवर कोण येईल याचा निर्णय होईल. सरकारचा कार्यकाल संपत आल्यानंतर लोकसभा निवडणुकीच्या तारखांबद्दल उत्कंठा असतेच परंतु यावेळी ती जरा जास्तीच होती. त्याची कारणेही अनेक होती आणि त्यापैकी एक म्हणजे निवडणुका खरोखर घेतल्या जातील का याबाबतच अनेकांच्या मनात असलेली शंका. पुलवामा येथील दहशतवादी हल्ल्यानंतरच्या युद्धसदृश्य परिस्थितीमुळे ही शंका अधिक बळावली. केंद्रीय निवडणूक आयोगाने रविवारी सायंकाळी निवडणुकीच्या तारखा जाहीर करून ती निकालात काढली. आचारसंहिता लागू होण्याआधी लोकांना कामे दिसावीत म्हणून गेले आठवडाभर केंद्रातील आणि राज्यातील सरकारनेही विविध कार्यक्रमांचा तसेच लोकानुनयी निर्णयांचा धडाका लावला होता. निवडणुका जाहीर झाल्यामुळे तो धडाकाही थांबला आहे. देशभरात ९० कोटी मतदारांची नोंदणी झाली असून आजवरचे लोकसभा निवडणुकीतील मतदानाचे प्रमाण पाहता ६० ते ७० कोटी मतदार मतदानाचा हक्क बजावू शकतील. एवढ्या मोठ्या संख्येने लोक सहभागी होण्याची जगभरातील ही सर्वात मोठी प्रक्रिया असावी आणि ती निर्वेधपणे पार पाडण्यासाठी निवडणूक आयोगाने कंबर कसली आहे. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांच्यासंदर्भात (इव्हीएम) मधल्या काळात अनेक पक्षांनी वारंवार तक्रारी केल्या आणि पुन्हा मतपत्रिकेद्वारे मतदान घेण्याची मागणी केली, परंतु निवडणूक आयोगाने प्रतिसाद दिला नाही. साहजिकच, आयोगाची विश्वासार्हता संशयाच्या भोवऱ्यात सापडली. मतदानयंत्रांच्या विश्वासार्हतेसाठी व्हीव्हीपॅटचा पर्याय पूर्वीपासून होता, मात्र आयोगाने त्याचा वापर कधी केला नव्हता. संपूर्ण राज्यातील चारदोन मतदारसंघांतील काही ठराविक केंद्रांवर व्हीव्हीपॅट असे आणि त्यांची मोजणीही कधी व्हायची नाही. यावेळी सर्व ठिकाणी व्हीव्हीपॅटची व्यवस्था असेल. त्यामुळे एखाद्या ठिकाणी उमेदवाराला निकाल संशयास्पद वाटला तर तो व्हीव्हीपॅटच्या मतांची मोजणी करण्याची मागणी करू शकतो. पाच वर्षासाठी निवडून द्यावयाच्या सरकारसाठी सात टप्प्यांत मतदान घेऊन दोन महिने प्रक्रिया राबवली जाते आणि निकाल मात्र झटपट लावण्यासाठी अट्टहास केला जातो. झटपट निकालाचा आग्रह ठीक असला तरी त्यासाठी मतदानप्रक्रियेची विश्वासार्हता पणाला लावण्याचे आणि पारदर्शकतेला तिलांजली देण्याचे कारण नाही. व्हीव्हीपॅटच्या मोजणीतही आयोगाने लवचिक धोरण ठेवायला हवे. याने नागरिकांचा लोकशाही प्रक्रियेवरील विश्वास दृढ होईल. मतदान किती टप्प्यात घ्यावयाचे, याचे नियोजन साहजिकच कायदा-सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने विचार करून घेतला जात असतो. परंतु यावेळचे एकूण टप्प्यांचे नियोजन पाहता ते खरोखर कायदा-सुव्यवस्थेच्या दृष्टीने विचार करून केले आहे, की काही नेत्यांच्या प्रचारसभांचे वेळापत्रक नजरेसमोर ठेवून केले आहे, अशी शंका येऊ शकते. त्याचप्रमाणे जम्मू-काश्मीरमध्ये लोकसभा निवडणूक होत असताना विधानसभा निवडणूक घेतली जात नाही, यामागचे तर्कशास्त्रही उमगत नाही. अर्थात, संस्था कितीही स्वायत्त असली तरी सत्ताधाऱ्यांचा अंकुश असतोच, त्यामुळे अशा बारीकसारीक गोष्टींकडे दुर्लक्ष करावे लागणार आहे. दीड कोटी मतदार यावेळी पहिल्यांदाच मतदान करणार असून राष्ट्रवाद की रोजगार याचा निर्णय त्यांना घ्यावा लागेल. सोशल मीडियाचा वापर होणारी ही दुसरी निवडणूक आहे. पहिल्या निवडणुकीत भाजपने या माध्यमाचा प्रभावी वापर केला होता आणि बाकीचे पक्ष त्यासंदर्भात बेसावध होते. मधल्या काळात इतरांनीही सोशल मीडियासंदर्भातील ज्ञानप्राप्ती करून घेतली असल्यामुळे तिथे रंगणारे युद्धही रंजक असेल. किंबहुना जाहीर प्रचाराची आणि राजकीय पक्षांच्या भूमिकेची दिशा ठरवण्यातही सोशल मीडिया महत्त्वाची भूमिका बजावत असल्यामुळे निवडणूक आयोगाची तिथेही बारीक नजर असणार आहे. निवडणूका जाहीर झाल्यावर काही ठिकाणी आदर्श आचारसंहितेचा अतिरेक होत असतो, तर काही ठिकाणी रान मोकळे असते. आचारसंहितेच्या नावाखाली मुंबई-पुणे एक्सप्रेस वे वरील हॉटेल्स रात्री बाराला बंद करून हजारो प्रवाशांची गैरसोय करण्याचा आचरटपणा केला जातो, अशा बाबींबाबत मध्यवर्ती यंत्रणेने स्पष्टता राखायला हवी. पुढील काही दिवसांत होणार असलेले आरोप-प्रत्यारोप, दावे-प्रतिदावे आणि बाहया सरसावून होणारी भाषणे यांतून खरे-खोटे पारखून आपले मत तयार करणे ही मतदारांची मोठीच परीक्षा असली तरी भारतीय मतदार सुजाण आहेच.



# कितीही का पडेनात...



**मुंबईची उमेद (Mumbai Spirit) या नावाने ज्याचा उदो उदो केला जातो ते एक थोतांड असून ज्यास उमेद म्हटली जाते ती प्रत्यक्षात मुंबईकरांची अपरिहार्यता आहे. जगण्याची असहायता. आसपासची परिस्थिती मनुष्यनामक प्राण्यास जगण्यालायक नसली तरी जगण्याच्या फुटक्या प्राक्तनाची असहायता. छत्रपती शिवाजी महाराज स्थानकाबाहेरील पुलाखाली ज्यांनी कोणी प्राण गमावले त्यांच्या मरणातून हीच असहायता पाझरते. हे शहर ही अशी संधी वारंवार देते. गेल्या वर्षी १७ डिसेंबरास रुग्णालयास लागलेल्या आगीत १३ जण होरपळून गेले. त्याआधी जुलै महिन्यात अंधेरी स्थानकाबाहेरचा पूल कोसळला. २०१७ सालच्या डिसेंबरातील थंडीत कमला मिल परिसरातील हॉटेलच्या आगीने १४ जणांना गिळले. त्याच वर्षी साकीनाका परिसरात फरसाणाच्या दुकानास लागलेल्या आगीनेही १२ जणांचे प्राण होरपळून घेतले. त्याच वर्षी एल्फिन्स्टन रोड स्थानकात माणसांच्या पायांखालीच २३ जण चिरडले गेले. काळबादेवीतल्या आगीचे प्रकरणही तसेच. ही झाली मृत्यूची घाऊक उदाहरणे. त्याखेरीज झाड पडून, रस्ता खचून, गटारात पडून, वाहन उलटून, वाहनास धडकून, रेल्वे रुळांखाली आणि इतकेच काय विमान वगैरे पडून इहलोकीची यात्रा संपवणाऱ्यांची तर गणतीदेखील हे शहर ठेवत नाही. अशा वेळी नवा एखादा अपघात घडतो आणि मुंबईची उमेद या वाक्प्रचाराचा गौरवपूर्ण उल्लेख करणाऱ्यांना नव्याने चेव येतो. या शहराच्या गतीचे कौतुक सुरक्षित वातावरणात जगणारे मोठ्या कौतुकाने करतात.**

पण प्रत्येक गती ही सकारात्मकतेचे दर्शन घडवत नाही, हे या अज्ञानींना कसे कळणार? नुसत्या गतीतून खरे तर काहीच ध्वनित होत नाही. स्थितीवादी अवस्था नाही इतकेच काय ते कळते. पण गती प्रगतीच असायला हवे असे नाही, गती म्हणजे अधोगतीदेखील असू शकते, याची जाणीवच मुंबईचे अनाठायी कौतुक करणाऱ्यांना नाही. मुंबई पदोपदी, क्षणोक्षणी या वास्तवाची जाणीव करून देते. अशा वेळी पूल पडल्यामुळे झालेल्या आणखी एका अपघाताबाबत उद्वेग वा संताप वा करुणा व्यक्त करणे हे अत्यंत सोपे काम. तसे केले की शहराप्रति आपले कर्तव्य केल्याचे पुण्यदेखील पदरी जमा होते. परंतु हे असे करणे हे वास्तवाला भिडणे नव्हे. यावर काही, वास्तवास भिडण्याची गरजच काय, असा प्रश्न विचारू शकतात. सध्याच्या वातावरणात तर तीच शक्यता अधिक. त्याची गरज आहे. एखाददुसरा घडणारा अपघात जेव्हा पाचवीलाच पुजल्यासारखा वाटू लागतो आणि सकाळी कार्यालयास निघालेला आपला कुटुंबीय संध्याकाळी धड अंगाने घरी येईल याची शाश्वती नाहीशी होते त्या वेळी शहरांच्या किडक्या वास्तवाच्या सत्यास भिडण्याची गरज निर्माण होते.

मुंबईची जी काही अवस्था झाली आहे तीच थोड्याफार प्रमाणात आपल्या देशातील अन्य शहरांचीदेखील आहे. राज्यातील प्रसारमाध्यमे मुंबईकेंद्री असल्यामुळे येथील घातअपघातांचे वृत्त चोहीकडे पसरते. पण आपली सर्वच शहरे ही अशी मरणकळा भोगत आहेत, हे आपण मान्य करायला हवे. ही समस्या मानवनिर्मित आहे. तीस जबाबदार घटक दोन. पहिला अर्थातच राज्यकर्त्यांचा आणि दुसरा या राज्यकर्त्यांवर विश्वास ठेवणाऱ्या नागरिकांचा. म्हणजे आपला.

प्रथम राजकारण्यांविषयी. या देशात एकही राजकारणी शहरांची बाजू घेत नाही. तसे करणे त्यास खेड्यांविरोधी, म्हणजेच गरिबीविरोधी वाटते. असे वाटून कसे चालेल? तेव्हा राजकारणी हा धोका पत्करत नाहीत. मुंबईत राज ठाकरे यांच्यासारखा एखाददुसरा अपवाद शहरांच्या नावे कंठशोष करतो. पण त्यासाठी लागणारी राजकीय ताकद नसल्याने ते अरण्यरुदनच ठरते. राजकारण्यांच्या खेड्यांकडे पाहायचे आणि शहरात राहायचे या दुटप्पी धोरणांमुळे आपली शहरे कफल्लक होऊ लागली आहेत. जगातील धनाढ्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबई महापालिकेची परिस्थितीदेखील यापेक्षा वेगळी नाही. जवळपास ४० हजार कोट रुपयांचा अर्थसंकल्प असणाऱ्या या शहराची निम्म्यापेक्षा अधिक कमाई कर्मचाऱ्यांची पोटे भरण्यातच जाते. मुदलात इतक्या कर्मचाऱ्यांची महापालिकेस गरजच नाही. पण अशी खोगीरभरती करणे हा राजकारणाचा भाग. त्यामुळे पक्ष कोणताही असो महापालिकेचे उत्पन्न वाढेल असे काहीही करत नाही. त्यात या शहराच्या भाग्यविधात्यांना जनतेस काही ना काही मोफत देण्याचा सोस. अलीकडे काही घटकांसाठी मालमत्ता कराची केलेली माफी घोषणा ही याचाच भाग. खाणारी तोंडे वाढवत न्यायचे आणि वर उत्पन्नही कमी करायचे हा दुहेरी उद्योग सर्व राजकीय पक्ष शहरांबाबत करतात. पण मोफत काही मिळत असल्याने त्याविरोधात ब्रदेखील काढला जात नाही. मुंबईसारख्या शहराची जकात बंद झाली, जमीन विकासाला मर्यादा आणि वर मालमत्ता कर माफी. हे कमी म्हणून की काय वस्तू आणि सेवा कराने शहरांना आणखी कफल्लक केले. त्यांच्या उत्पन्नाचे साधनच त्यातून गेले. अशा वेळी शहरे चालवण्यासाठी पैसा आणायचा कोठून? बरे, राज्य सरकार देते म्हणावे तर तीदेखील तितकीच कफल्लक. तेव्हा शहरांचे मरण अटळ आहे यात शंका नाही.

दुसरा मुद्दा नागरिकांचा. यांतील बऱ्याच मोठ्या घटकाने विचार करणे थांबवले त्यासही आता बराच काळ लोटला. आता तर हा वर्ग अस्मितादी उन्मादी बाबींखेरीज काही बोलावयास तयार नाही. नागरिकांच्या मनांवर अस्मितांची फुंकर घालत बसले की त्यांच्या अन्य संवेदना बधिर होतात. त्यामुळे त्यांस प्रश्न पडेनासे होतात. म्हणूनच या शहराच्या धोरणकर्त्यांना येथील नागरिक ना रस्त्यातील खड्ड्यांविषयी प्रश्न विचारतात ना दरवर्षी शेकडो कोटींनी होणाऱ्या नालेसफाईनंतरही या शहराची दुर्दशा का होते हे त्यांना जाणवते. देशातील अर्धा डझन राज्यांपेक्षा आज मुंबई महापालिका मोठी आहे. पण तिला आलेली कळा म्हणाल तर ग्रामपंचायतीची. ती चालवणारे शहरपितेही त्याच बौद्धिक आणि सामाजिक मानसिकतेतले. ग्रामीण भागात आपले शेत कसणाऱ्यांकडून धान्याचा वाटा घेण्याची पद्धत आहे. शहरात त्यास टक्केवारी म्हणतात. येथील प्रत्येक कामाचा खर्च फुगवून सांगितला जातो. कारण ते काम ज्यांना मिळते त्यांना काम देणाऱ्यांचे हात ओले करायचे असतात. याकडे एक वेळ भ्रष्टाचार म्हणून पाहता आले असते. तो आहेही. पण तो आर्थिक भ्रष्टाचारापेक्षा अधिक गंभीर आहे. कारण भ्रष्टाचाराचा खर्च हा दर्जावरील तडजोडीतून केला जातो. म्हणजे पैशापरी पैसाही गेला आणि खराब दर्जामुळे प्राण जाण्याचीही हमी. ही हमी मुंबई देते.

तथापि यातील निर्लज्ज बाब अशी की आपल्या या अवस्थेची कबुली देण्याइतका प्रामाणिकपणाही या शहरात आता राहिलेला नाही. व्यभिचारींचा म्हणून एक प्रामाणिकपणा असतो. ते नैतिकतेचा आव आणत नाहीत आणि कीर्तने करण्याच्या फंदात पडत नाहीत. आपल्या नगरपित्यांचे तसे नाही. ते नको ते उद्योगही करणार आणि वर या शहरासाठी प्राण देण्याची भाषा करत नैतिक भूमिकाही घेणार. मुंबई महाराष्ट्रापासून तोडू देणार नाही, ही वल्गना या खोट्या नैतिकतेचाच भाग. तशी ती खरोखरच तुटली तर तिच्या नफ्यातल्या आपल्या वाट्याचे काय, हा प्रश्न. त्यास हात घालायची तयारी राजकीय पक्षांकडे असणारच नाही. पण नागरिकांकडेही नाही. खरे प्रश्न सोडवणाऱ्यांपेक्षा अस्मिता, उन्माद या तकलादू मुद्द्यांवरच मते मिळवता येत असतील तर खऱ्या प्रश्नांना हात घालेल कोण? ही अशी खोट्यात राहायच्या सवयीलाच हल्ली मुंबईची उमेद समजले जाते. शहर शरपंजरी पडले तरी आपली ही उमेद सुटायला तयार नाही. मग कितीही पूल का पडेनात.

## कळव्यात जादूटोणा, तिघांना कळवा पोलिसांनी केली अटक

**ठाणे** - जादूटोण्यावर कायद्याने बंदी असूनही कळव्यात जादूटोण्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. आर्थिक भरभराटीसाठी मानवी कवटी आणून ठेवणाऱ्या कळव्यातील एका व्यक्तीसह उल्हासनगरमधील पुजारी आणि स्मशानभूमीत काम करणारा एक कर्मचारी अशा तिघांना कळवा पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी एकूण दोन मानवी कवट्या आणि इतर साहित्य जप्त केले आहे.




कळव्यातील मफतलाल झोपडपट्टी येथील फक्रुद्दीन चाळीतील एका खोलीत मानवी कवटी असल्याची माहिती मिळाल्यानंतर कळवा पोलिसांनी शुक्रवारी अचानक या खोलीमध्ये छापा टाकला. यावेळी खोलीत एक कवटी सापडली. राजू रामअवतार शर्मा (४५) यानेच ही कवटी घरात आणून ठेवली होती. केटरर्सच्या कामानंतर सलूनचा व्यवसाय उघडूनही भरभराट होत नव्हती. त्याचदरम्यान कामानिमित्त शर्मा उल्हासनगरला गेला होता. त्यावेळी उल्हासनगरमधील महाराज तथा पुजारी कैलास बाबूलाल हटकर याच्याशी शर्माची ओळख झाली होती. घरात मानवी कवटी ठेवल्यास भरभराट येईल, तसेच त्रासही कमी होईल असे सांगण्यात आले होते. त्यानंतर शर्माने पुजाऱ्याकडून ६ हजार रुपयांमध्ये मानवी कवटी घेतली होती. मागील तीन महिन्यांपासून ही कवटी शर्माच्या घरात असल्याची माहिती पोलिस उपनिरीक्षक शिरीष यादव यांनी दिली.

## सहा महिन्यांत नवी मुंबईत मेट्रो सुरू?

### विधानसभा निवडणुकीपूर्वी वाहतूक सुरू करण्याच प्रयत्न; प्रकल्पाच्या कामांना गती

**नवी मुंबई : गेली चार वर्षे रखडलेला नवी मुंबई मेट्रो रेल प्रकल्पाच्या कामाने आता गती पकडली आहे. बेलापूर ते पेंदार या ११ किलोमीटर मार्गाचा हा मार्ग विधानसभा निवडणुकीपूर्वी सुरू होण्याची शक्यता आहे. या मार्गावरील व्हायडक्ट आणि स्टेशनची कामे आता अंतिम टप्प्यात असून चाचणीसाठी लागणारे डब्बे मेट्रो आगारात दाखल झाले आहेत.**



पेंदारच्या पुढे पावणेचार किलोमीटर लांब तळोजा एमआयडीसीत या मेट्रोचे जाळे विणले जाणार असून एमआयडीसी कामगारांना प्रवासाच्या दृष्टीने मोठा दिलासा मिळणार आहे. सहा वर्षांपूर्वी बेलापूर ते पेंदार या मेट्रो रेल्वे मार्गाच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला होता. सिडकोने दक्षिण नवी मुंबईत पाच मेट्रो मार्गाचा आराखडा तयार केला आहे. यात बेलापूर ते पेंदार या मार्गाचा पहिला प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. २६ किलोमीटर लांबीच्या या मार्गावर ८ हजार ८८७ कोटी रुपये खर्च करणार असून हा मार्ग खांदेश्वरमार्गे नवी मुंबई विमानतलाला जोडला जाणार आहे. मेट्रोच्या या सर्व कामावर दिल्ली मेट्रो कॉर्पोरेशन देखरेख ठेवीत असून सध्या व्हायडक्ट व स्टेशन ही कामे अंतिम टप्प्यात आहेत.

तळोजा रेल्वे मार्गावर उभारण्यात येणारे उड्डाणपुलाचे काम व शीव पनवेल मार्गावरील उड्डाणपूल जोडले गेले आहेत. त्यामुळे आता केवल विद्युत तांत्रिक कामे बाकी असून ती प्रगतिपथावर आहेत.

या प्रकल्पाच्या मेट्रो चाचणीसाठी लागणारे रेक्स (डब्बे) चीनवरून आयात करण्यात आले असून त्यांची चाचणी लवकरच घेण्यात येणार आहे. विधानसभा निवडणुकीअगोदर या मेट्रो मार्गाचा शुभारंभ करण्याचा प्रयत्न असून राज्य सरकारचे तसे प्रयत्न आहेत. त्यामुळे या कामाला आता गती आली आहे. या संदर्भात सिडकोच्या मुख्य जनसंपर्क अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता तो होऊ शकला नाही.

**कामगार व उद्योजकांना फायदा**

हा मार्ग पेंदार या सिडको क्षेत्राच्या पुढे तळोजा एमआयडीसीत नेण्याचा निर्णय एक वर्षांपूर्वी सिडको व एमआयडीसी या दोन महामंडळांनी घेतला आहे. तळोजा एमआयडीसीतील कामगार व उद्योजक यांना या मेट्रो वाहतुकीचा फार मोठा फायदा होणार आहे. त्यामुळे पावणेचार किलोमीटरचा वळसा घालून मेट्रो खांदेश्वर रेल्वे स्टेशनला येऊन मिळणार आहे.

## 'झोपु' घोटाळ्याचा अहवाल लवकरच



कल्याण-डोंबिवली पालिकेतील 'झोपडपट्टी पुनर्वसन' घोटाळ्याचा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने समाधानकारक तपास न केल्याने तक्रारदाराने राज्य पोलीस तक्रार प्राधिकरणाकडे तक्रार केली आहे. या तक्रारीची गंभीर दखल घेत प्राधिकरणाच्या खंडपीठाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या महासंचालकांना या प्रकरणी दाखल फौजदारी तक्रार, तसेच तपास अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. पुढील सुनावणी येत्या ५ एप्रिल रोजी ठेवण्यात आली आहे.

शहरी गरिबांना घरे (बीएसयूपी) देण्यासाठी केंद्र, राज्य शासनाच्या निधीतून कल्याण डोंबिवली पालिका हद्दीत दहा वर्षांपूर्वी ३३८ कोटी खर्चाची झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात आली. या योजनेतून कल्याण, डोंबिवली शहरांतील झोपडपट्टी भागांत १२५ इमारती उभारण्यात येणार होत्या. या इमारतीत १३ हजार झोपडीधारकांना घरे मिळणार होती. या योजनेसाठी लाभार्थी निश्चित नसताना तसेच योजनेच्या इमारती उभा राहणाऱ्या जमिनी पालिकेच्या नावावर नसताना नगररचना विभागाकडून बांधकाम परवानगी न घेताच इमारती बांधण्यात आल्या.

या कामांसाठी २९ टक्के वाढीव दराने निविदा स्वीकारण्यात आल्या. या प्रकल्पासाठी ३३८ कोटी खर्च अपेक्षित असताना ४०८ कोटीच्या निविदा मंजूर करण्यात आल्या. ७० कोटींचे दायित्व पालिकेवर पडले. या घोटाळ्यात पालिकेतील सर्व पक्षीय पदाधिकारी, तत्कालीन अधिकारी, लोकप्रतिनिधी, राजकीय नेते आणि ठेकेदार यांचा सक्रिय सहभाग असल्याने हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न विविध चौकशी स्तरांवरून झाला, असे तक्रारदार याचिकाकर्ते कौस्तुभ गोखले यांचे म्हणणे आहे. आता या योजनेत फक्त साडेतीन हजार लाभार्थींना घरे देण्यात आली. बहुतांशी योजना ठप्प पडली.

## मोखाड्यात टंचाईच्या झळा; हंडाभर पाण्यासाठी मायलेकींची मैलोन्मैल पायपीट

***मोखाडा : तालुक्यातील आदिवासी गाव पाड्यांना टँकर मुक्त पाणी पुरवठा व्हावा यासाठी गेल्या अनेक वर्षापासुन स्थानिक प्रशासन व लोकप्रतिनीधींकडून होणारे प्रयत्न तोकडे असल्याने आदिवासीची घोटभर पाण्यासाठी होणारी पायपीट अजुन ही थांबलेली नाही. नियोजनाचा अभाव, अपयशी ठरलेल्या २४ नळ पाणी पुरवठा योजना, जलयुक्त शिवार योजना आदींमुळे टँकर मुक्त गावाची संख्या वर्ष निहाय वाढत चालली आहे. लांबच लांब पायपिट करुन हंडाभर पाणी मिळत असल्याने हाताला काम नको, खायला अन्न नको पण प्यायला पाणी द्या अशी आर्त हाक येथील आदिवासी गावकऱ्यांनी दिली आहे.***

तालुक्यात जवळपास ५ मोठी धरणे असुन तेथून १२० किलो मीटर अंतरावर असणाऱ्या मुबंई शहराला पाणी पुरवठा होत आहे. मात्र, स्थानिक गाव पाडे पाण्याविना तहानलेलिच आहेत. सद्यस्थितीत तालुक्यातील ४६ गाव पाड्यात पाणी बाणीचे संकट निर्माण झाले असून दिवसाआड टंचाई ग्रस्त गाव पाड्यांना १५ टँकर ने पाणी पुरवठा सुरू आहे. दररोज वेगवेगळ्या गावातून टँकर मागणीचे प्रस्ताव पाणी पुरवठा विभागाकडे येऊन धडकत असल्याने प्रशासनाची देखील धावपळ उडत आहे. उन्हाळ्याच्या सुरवातीला दरवर्षी उद्धवणाड्या परिस्थिती वर कायम स्वरु पी तोडगा काढण्याचे शहाणपण मात्र कोणालाच सुचत नसल्याने गाव पाडे वासियांकडुन रोष व्यक्त केला जात आहे. गाव पाड्यांना पाणी पुरवठा करणाड्य विहिरींपासुन टंचाई ग्रस्त गाव पाडे २०-२५ किलो मीटर अंतरावर विखुरलेले असल्याने टँकर चालकांनाही चांगलीच कसरत करावी लागत आहे.

महत्त्वाची बाब म्हणजे टंचाई ग्रस्त नागरिकांना हातातली कामे सोडुन देऊन घोटभर पाण्यासाठी वणवण भटकंती करावी लागत आहे तर टँकर चालु असलेल्या गाव पाड्यांतील जनतेला चातक पक्षा प्रमाणे टँकर ची दिवसभर वाट बघावी लागत असुन मोलमजुरी करु न पोटाची खळगी भरणार्या आदिवासी बांधवाची मोठी अडचण झाली आहे.

दिवसाआड पाणीपुरवठा होत असल्याने संताप : राज्य शासनाने जव्हार मोखाडा हे दोन्ही तालुके दुष्काळग्रस्त जाहीर केले आहेत. टंचाईग्रस्त गावपाड्यांना त्वरित पाणीपुरवठा करण्याचे आदेश दिले आहेत. परंतु असे असताना देखील तालुक्यातील कीनिस्ते, शेलमपाडा, धामोडी, पाथर्डी, डोंगर वाडी,



वशिंद या गावपाड्यांना दिवसाआड पाणी पुरवठा होत असल्याने येथील आदिवासीची पाण्यासाठी होणारी पायपीट आणखी वाढली आहे

### पुढाऱ्यांवर रोष

आगामी लोकसभा निवडणुकीचे बिगुल वाजले असून विजयाची गणिते जुळवण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांकडून कंबर कसली जाणार आहे. परंतु गेल्या अनेक निवडणुकांच्या आश्वासनात येथील पाण्याचा प्रश्न सुटलेला नाही. भूमिपुत्रांचेच्या हक्काचे पाणी मुबंईला पुरवले जाते परंतु स्थानिक पाणी टंचाई भोगत आहेत. धरना लगत असलेल्या गावांना हंडाभर पाण्यासाठी वणवण करावी लागते. यावर कायमस्वरूपी उपाययोजना नकरता टँकर लॉबीच्या घशात कोट्यवधी रु पये घालण्याचा वाझोटा प्रयत्न दरवर्षीच प्रशासनाकडून केला जात आहे. यामुळे पाण्याच्या प्रश्नावरु न पुढाड्यांना रोषाला सामोरे जावे लागणार आहे.

## आचारसंहितेमुळे फलकमुक्ती

**ठाणे** : ठाणे लोकसभा निवडणूक आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने ठाणे शहराच्या नाक्यानाक्यांवर झळणारे ३५० फलक उतरविले आहेत. भिवंडी आणि कल्याणमध्येही शेकडो फलक हटवण्यात आले. गेल्या काही महिन्यांपासून सर्वच राजकीय पक्षांनी मोठ्या प्रमाणात फलकबाजी केली होती. त्यामुळे शहर विद्रूप झाले होते.

मंगळवारी भिवंडी लोकसभा मतदारसंघात ४२९ बॅनर, ३०३ पोस्टर, ४७ होर्डिंग आणि १४० झेंडे तर कल्याण लोकसभा मतदारसंघात ४१९ बॅनर, २९४ पोस्टर, ३१ होर्डिंग आणि २३९ झेंडे काढण्यात आले. या कारवाईमुळे संपूर्ण जिल्हा फलकमुक्त झाल्याचे चित्र आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुका जवळ आल्याने गेल्या काही महिन्यांपासून शहरातील वेगवेगळ्या भागांत विविध राजकीय पक्षाच्या नेत्यांनी तसेच इच्छुकांनी जोरदार फलकबाजी सुरू केली होती. ठाणे शहर विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेचे एक नेते यामध्ये आघाडीवर होते. लोकसभा निवडणुकीसाठी शिवसेना भाजपमध्ये युती झाल्यानंतर या नेत्याने गेल्या काही दिवसांपासून बॅनरबाजी आवरती घेतली आहे. तरीही वेगवेगळ्या विकासकामांचे श्रेय घेण्यावरून सर्वपक्षीय नेत्यांमध्ये चुरस पाहायला मिळत होती. सण, उत्सव तसेच पक्षाचे मेळावे आणि सभा अशा कार्यक्रमांच्या माध्यमांतून इच्छुक उमेदवार जागोजागी फलकबाजी करत होते.

स्वतःच्या वाढदिवसाचे फलकही जागोजागी लावून मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न सुरू होता. वरिष्ठांची मर्जी राखण्यासाठी त्यांच्या वाढदिवसाचेही फलक शहरभर लावले जात होते. अनेक फलक बेकायदा असल्याच्या प्रतिक्रिया नागरिकांमधून उमटत होत्या.

# विरार-अलिबाग मल्टी मॉडल कॉरिडॉरला उरणच्या शेतकऱ्यांचा विरोध

**न्हावाशेवा- एमएमआरडीएचा महत्वकांक्षा प्रकल्प असलेल्या विरार ते अलिबाग मल्टिमॉडल कॉरिडॉरसाठी उरण तालुक्यातील आठ गावातील जमिन संपादित करावी लागणार असून यासाठी पनवेल उपविभागीय लोकांचे म्हणणे जाणून घेण्यासाठी शनिवार दि. १६ रोजी शेतकऱ्यांची बैठक बोलाविली आहे. मात्र शेतकऱ्यांनी जास्त संख्येने बैठकीला येवू नये म्हणून घाई-घाईत ही बैठक बोलाविली असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.**

अचारसंहितेच्या काळात कोणताही धोरणात्मक निर्णय घेता येत नसताना या बाबत फक्त चार दिवस अगोदर १२ मार्चला ही बैठकीची नोटीस काढल्याने प्रशासनाची चापलूसी यातून दिसून येते. उरण तालुक्यातील जासई, चिर्ले, वेश्वी, बेलोंडाखार, दिघोडे, विंधणे, चिरनेर, धाकटीजुई, चिखली भोम आदी महसूली गावातील जमिनी संपादित केल्या जाणार आहेत. शेतकऱ्यांना विश्वासात न घेता जबरदस्तीने या प्रकल्पाला जमिन घेण्याचा शासनाचा प्रयत्न असून या प्रकल्पाला येथील शेतकरी तीव्र विरोध करणार आहेत. हा प्रकल्प येथे येणार असल्याचे समजल्यानंतर धनदांडग्यांनी शेकडो एकर जमिनी या परिसरात घेवून ठेवल्या असल्यामुळे फक्त धनदांडग्याच्या भल्यासाठी हा प्रकल्प राबविला जाणार असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. यापूर्वी एमएमआरडीएच्या विकास आराखड्याला येथिल शेतकऱ्यांनी हरकती घेवून तीव्र विरोध केला होता तरीही २०१६-२०३६ विकास आराखडा मंजूर करण्यात आला आहे. आता देखील तसाच प्रकार असून मल्टीमॉडल कॉरिडॉरची बैठक हा निव्वळ फार्स असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. या बैठकीला प्रत्येक ग्रामपंचायतीकडून विरोधाचे पत्र देण्यात येणार असल्याचे एमएमआरडीए विरोधी संघर्ष समितीचे समन्वयक रूपेश पाटील यांनी सांगितले. या बाबत पनवेल विभागाचे उपविभागीय अधिकारी दत्तात्रेय नवले यांच्याकडे विचारणा केली असता या बैठकीत लोकांचे म्हणणे ऐकून घेतले जाणार असून जमिनीच्या भावाबाबत कोणतीही चर्चा होणार नसल्याचे सांगितले.



## राष्ट्रवादीची दुसरी यादी जाहीर; मावळमधून पार्थ पवारना उमेदवारी जाहीर, शिरुरमधून डॉ. अमोल कोल्हे

**मुंबई-** राष्ट्रवादी काँग्रेसने काल ११ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केल्यानंतर आज (ता. १५) दुसरी यादी जाहीर केली. अत्यंत बहुचर्चित ठरलेल्या पवार घराण्यातील पार्थ पवार यांना मावळमधून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. शिरुरमधून नुकतेच राष्ट्रवादीमध्ये डेरेदाखल झालेल्या डॉ. अमोल कोल्हे यांच्या गळयात उमेदवारीची माळ पडली. राष्ट्रवादीने दुसऱ्या यादीमध्ये ५ उमेदवारांच्या नावाची घोषणा केली. राष्ट्रवादीकडून अजूनही नगर, माढा आणि गोंदियामधील उमेदवार जाहीर करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे उमेदवारी कोणाच्या गळयात पडणार यावर चर्वितचर्वण सुरू आहे. राष्ट्रवादीकडून राज्यातील १४ जागांवरील उमेदवार घोषित करण्यात आले आहेत. हातकणंगलेमधून स्वाभिमानीला राष्ट्रवादी पाठिंबा देणार आहे.



नाशिकमधून समीर भूजबळ यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. दिंडोरीमधून धनराज महाले यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. बीडमधून बजरंग सोनवणे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने काल पहिली उमेदवार यादी जाहीर केली. त्यामध्ये माढा, मावळ, बीड, नगर आणि गोंदियामधील उमेदवार घोषित करण्यात आलेले नव्हते. त्यामुळे या जागांवर कोणाला उमेदवारी मिळणार ? याची उत्सुकता ताणली होती. आता मावळमधून पार्थ पवारना उमेदवारी जाहीर झाल्याने त्यांच्या राजकीय प्रवेशावर अखेर शिक्कामोर्तब झाले आहे. पहिल्या यादीतून बारामतीमधून खासदार सुप्रिया सुळे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. अपेक्षेप्रमाणे साताऱ्यातून खा. उदयनराजे यांना उमेदवारी जाहीर झाली. कोल्हापुरातून खा. धनंजय महाडिक यांना देण्यात आली.

## एटीएममधून आता कार्डशिवाय काढा पैसे

**नाशिक-** एटीएएम मशीनमधून कार्डच्या वापराशिवाय ग्राहकांना पैसे काढता येणार आहेत. यासाठी स्टेट बँक ऑफ इंडियाने (एसबीआय) योनो कॅश सेवा सुरू केली आहे. नाशिकमध्ये २५ योनो कॅश प्वॉईंट विकसित करण्यात आले आहेत. एसबीआयच्या तब्बल १६ हजार ५०० एटीएममध्ये योनो कॅशसेवेव्दारे पैसे काढणे शक्य होणार आहे. ही सुविधा उपलब्ध करून देणारी एसबीआय ही देशातील पहिली बँक ठरली असल्याची माहिती बँकेचे नाशिक विभागाचे उपमहाप्रबंधक सुधीर भागवत यांनी दिली. देशात आर्थिक आणि जीवनशैलीविषयक सेवांचा लाभ ज्याप्रकारे घेतला जातो त्यात सुधारणा करण्यासाठी योनो हे एसबीआयचे एक मोठे पाऊल आहे, असे बँकेचे नाशिक विभागाचे उपमहाप्रबंधक सुधीर भागवत यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. ते म्हणाले, ८५ ई कॉमर्स कंपन्यांकडून कस्टमाईज्ड उत्पादने व सेवा देणारी ही पहिली सर्वंकष डिजीटल बँकींग सुविधा आहे. योनो एसबीआयमध्ये नोव्हेंबर २०१७ ला दाखल झाले. आता ही सुविधा वर्षभराची झाली आहे. फेब्रुवारी २०१९ पर्यंत योनोने १८ लाखापेक्षाही अधिक डाऊनलोडची नोंद केली आहे. ७ लाखांपेक्षाही अधिक सक्रीय युजर्स आहेत. अँड्रॉईड व आयओएस असणाऱ्या मोबाईल फोनव्दारे आणि ब्राऊजरव्दारे वेबवर योनोचा वापर करता येऊ शकतो, असेही भागवत म्हणाले.

## ५०० चौरस फुटांपर्यंतच्या घरांना मालमत्ता करमाफ

**मुंबई-** बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या हद्दीतील निवासी इमारतींमधील ५०० चौरस फुटांपर्यंत चटई क्षेत्र असलेल्या घरांचा मालमत्ता कर संपूर्णत: माफ करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वीच्या मंत्रिमंडळाच्या या शेवटच्या बैठकीत मुंबईकरांना ही खूशखबर देण्यात आली. ५०० चौरस फुटापर्यंतच्या घरांना मालमत्ता कर पूर्णत: माफ करावा आणि ५०१ ते ७०० चौरस फुटांपर्यंतच्या निवासी गाळ्यांना ६० टक्के सवलत मालमत्ता करात द्यावी, असा ठराव मुंबई महापालिकेने ६ जुलै, २०१७ रोजी केला होता. तसा प्रस्ताव शासनास सादरदेखील करण्यात आला होता. त्यातील ५०० चौरस फुटांपर्यंतच्या घरांना मालमत्ता करमाफीचा निर्णय झाला. त्यासाठी लवकरच कायद्यात दुरुस्ती केली जाणार आहे. त्या संबंधीचे विधेयक विधिमंडळाच्या जूनमधील अधिवेशनात विधिमंडळात मांडण्यात येणार आहे. विधेयक अधिवेशनात मांडण्यात आल्यानंतर त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी १ जानेवारी, २०१९ पासून करण्यात येणार आहे. त्यामुळे १ जानेवारीपासून आजपर्यंत मालमत्ता कर भरलेल्यांना त्याची रक्कम परत मिळू शकेल. त्यामुळे त्यांना दिलासा मिळणार आहे. ५०१ ते ७०० चौरस फुटांपर्यंत चटई क्षेत्र असलेल्या



निवासी इमारती किंवा गाळ्यांच्या बाबतीत मालमत्ता करातून सूट देण्यासंदर्भातातील अधिकार हे बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे आहेत. त्यासाठी अधिनियमात सुधारणा करण्याची गरज नाही, असे शासनाने स्पष्ट केले. त्यामुळे शिवसेनेच्या हातात असलेली महापालिका याबाबत काय निर्णय घेते, हे आता महत्त्वाचे असेल. विधेयक अधिवेशनात मांडल्यानंतर १ जानेवारी, २०१९ पासून प्रत्यक्ष अंमलबजावणी होईल.भाजपा-शिवसेनेची लोकसभा, विधानसभा निवडणुकीसाठी युतीची घोषणा करताना, ५०० चौरस फुटांपर्यंतच्या मुंबईतील निवासी गाळ्यांना मालमत्ता कर माफ केला जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले होते. शिवसेनेने युती करताना टाकलेली अट मान्य करण्यात आली होती, त्यावर अखेर शिक्कामोर्तब झाले.

## पवारच भाजपमध्ये आल्यास निघुन जाईल निवडणुकींची रंगत



**मुंबई-** युती झाल्यानंतर पहिल्यांदाचा अमरावतीत शिवसेना-भाजप युतीचा महामेळावा पार पडला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यावेळी उपस्थित होते. यावेळी बोलताना उद्धव ठाकरे यांनी आजकाल कोणावर टीका करायची म्हणजे भीती वाटते कारण तो उद्या भाजप किंवा शिवसेनेत असायचा असे म्हटले आहे. याच दरम्यान उद्धव यांनी यावेळी शरद पवारांना तेवढे भाजपत घेऊ नका असे म्हणत, मुख्यमंत्र्यांना चिमटा काढला. उद्धव ठाकरेंनी यावेळी युतीवर भाष्य केले. वाद असले तरी कधीही आपला संघर्ष कधीही राज्याच्या हिताआड येऊ दिले नसल्याचे सांगताना नरेंद्र मोदींचेही उद्धव ठाकरेंनी कौतुक केले. मी त्यांना अजूनही नरेंद्रभाई असे म्हणतो. देशाच्या पंतप्रधानपदी आपला भाऊ वाटावा अशी व्यक्ती असल्याचा अभिमान असल्याचे उद्धव ठाकरेंनी म्हटले आहे. दोन्ही पक्षांकडून काही दिवसांपूर्वी उघड तलवारी काढल्या होत्या, ज्या काही गोष्टी झाल्या त्या आता सगळ्या विसरा आणि खऱ्या तलवारी काढून आता मैदानात उतरा असे आवाहन यावेळी उद्धव ठाकरेंनी केले. मनातून आणि म्यानातून मुख्यमंत्र्यांनी तलवारी काढल्या असल्याचेही यावेळी ठाकरे म्हणाले.

## आता पाळीव प्राण्यांचाही उतरविता येणार विमा

**मुंबई-** ज्यांच्या कडे पाळीव प्राणी आहेत, त्यांना आपल्या लाडक्या प्राण्यांचा विमा उतरविता येणार असून, अनेक विमा कंपन्यांनी ही सोय उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला असल्याचे समजते. या विम्याअंतर्गत पाळीव प्राणी आजारी असल्यास, किंवा त्याला अपघात झाल्यास त्याच्या उपचारासाठी खर्च करण्यात येणारी रक्कम 'क्लेम' करता येऊ शकणार आहे. दुध उत्पादनासाठी गायी, म्हशी, किंवा शेतीच्या कामी वापरण्यात येणारे बैल, अशा प्राण्यांचे विमे उतरविण्याची सोय आधीपासून उपलब्ध असून, यांचा फायदा शेतकरी बंधू घेत आहेत. विमा कंपन्या आता ज्या पाळीव प्राण्यांच्या करिता विमा उतरविण्याची सोय उपलब्ध करून देत आहेत त्यांमध्ये कुत्रे, मांजरी,



पक्षी, शेळ्या-मेंढ्या, बकऱ्या, घोडे, ससे आणि हत्ती या प्राण्यांचा समावेश आहे. काही विमा कंपन्या केवळ कुत्र्यांसाठी विमा उपलब्ध करून देत आहेत. विम्याच्या अंतर्गत प्राण्याला झालेला आजार, अपघात, मृत्यू किंवा प्राण्यामुळे कोणाला इजा झाल्यास त्याची नुकसानभरपाई करण्यासाठी खर्च होणारी रक्कम क्लेम करता येणार आहे. पाळीव प्राण्यांचा विमा उतरविताना काही नियमांची पूर्तता करणे आवश्यक असणार आहे. प्रत्येक प्राण्याची आयुमर्यादा निराळी असून, त्यानुसार त्यांचा विमा केला जाणार आहे.

कुत्री किंवा मांजरांचा विमा ते आठ महिन्यांचे असल्यापासून आठ वर्षांचे असेपर्यंतच्या काळादरम्यान उतरविता येणार आहे, तर गायी-म्हशींचा विमा उतरविण्यासाठी त्यांचे वय दोन ते आठ वर्षांच्या दरम्यान असणे गरजेचे आहे. हा विमा उतरविताना जनावराचे वय, प्राण्याची ओळख पटविता येईल अशी शारीरिक खूण, रंग, लिंग, प्रजाती, आणि तत्सम इतर माहिती असणारे डॉक्टरांचे सर्टिफिकेट पुरविणेही बंधनकारक असणार आहे.

## '२०१९ नंतर कोणतीच निवडणूक होणार नाही'



**नवी दिल्ली-** वादग्रस्त वक्तव्यावरुन नेहमीच प्रकाशझोतात राहणारे भारतीय जनता पक्षाचे खासदार साक्षी महाराज पुन्हा एकदा केलेल्या वक्तव्यामुळे चर्चेत आले आहेत. २०१९ च्या निवडणुकीनंतर २०२४ च्या निवडणुका होणार नाहीत, अशा पद्धतीचे वक्तव्य त्यांनी उन्नाव येथे एका कार्यक्रमात केले. दरम्यान साक्षी महाराज यांच्या या वक्तव्यानंतर सोशल मीडियावर नव्या चर्चेस तोंड फुटले आहे. उन्नावमध्ये येथे एका कार्यक्रमात कार्यकर्त्यांना संबोधित करताना ते म्हणाले की, ''ही निवडणूक पक्षाची निवडणूक नाही, साक्षी महाराजांची निवडणूक नाही. पहिल्यांदाच देशात जागृती झाली आहे व हिंदू जागा झाला आहे. मी एक संन्यासी आहे आणि मी मनात येते तेच बोलतो. या निवडणुकीनंतर २०२४ च्या निवडणुका होणार नाहीत, फक्त २०१९ च्या निवडणुका होणार आहेत.'' साक्षी महाराज भाषणात म्हणाले की, ''२०१४ मध्ये देशात सर्वत्र मोदी लाट होती, मात्र यावेळी मोदी नावाची त्सुनामी आली आहे. अशावेळेस आघाडी यासारख्या गोष्टींचा काहीच उपयोग नाही. तसेच यावेळी देखील कोणतीच ताकद नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान बनण्यापासून रोखू शकत नाही. यापूर्वी साक्षी महाराज यांच्या एका चिठ्ठीने चांगलाच धुमाकूळ घातला होता.


## राज्यात निर्णायक ठरणार महिलाशक्ती !

**मुंबई-** राज्यात चार टप्प्यात होणाऱ्या लोकसभा निवडणुकीतील उमेदवारांचे भवितव्य ठरविण्यात यंदा महिला मतदारांचा महत्वाचा वाटा असेल. यावर्षी राज्यात तब्बल ४ कोटी १६ लाख महिला मतदार मतदानाचा हक्क बजावतील. पुरुष मतदारांच्या बरोबरीने महिला मतदारांची संख्या झाली आहे. राज्यात एकूण ८ कोटी, ७३ लाख, ३० हजार ४८४ मतदार असून त्यापैकी ४ कोटी ५७ लाख २ हजार ५७९ पुरुष मतदार आहेत. २००४ मध्ये पुरुष आणि महिला मतदार अशी स्वतंत्र नोंदणी करण्यात आलेली नव्हती. त्यामुळे त्यावर्षी एकूण ३ कोटी ४२ लाख ६३ हजार ३१७ मतदारांची नोंदणी झाली. २००९ आणि २०१४ या दोन्ही लोकसभा निवडणुकीसाठी करण्यात आलेल्या मतदार नोंदणीमध्ये महिला मतदारांची संख्या पुरुष मतदारांपेक्षा कमी होती.



## 'घाबरलो असतो तर घरी बसलो असतो'

**नाशिक-** नाशिकमधून समीर भुजबळ यांना राष्ट्रवादी काँग्रेसनं उमेदवारी दिल्यानंतर छगन भुजबळांचा पत्ता का कापला गेला? अशी चर्चा रंगली. त्यानंतर आता छगन भुजवळ यांनी पत्रकार परिषद घेत सर्व आरोपांना प्रत्युत्तर दिलं. आम्ही जर घाबरलो असतो तर घरीच बसलो असतो. जाहीर सभा घेतल्या नसत्या. युवकांना संधी मिळावी या उद्देशानं राष्ट्रवादी काँग्रेसनं उमेदवारी दिल्याचं भुजबळ यांनी म्हटलं आहे.




नाशिकमधून छगन भुजबळ यांना उमेदवारी मिळणार अशी चर्चा होती. पण, पुतणे समीर भुजबळ यांना उमेदवारी देण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेसनं आत्तापर्यंत १७ उमेदवार जाहीर केले आहेत. यामध्ये मावळमधून अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांना उमेदवारी देण्यात आली आहे. यावेळी बोलताना शरद पवार यांनी आत्तापर्यंत पराभव पाहिलेला नाही. त्यामुळे माघार घेण्याचा संबंध नाही. वंचित आघाडी सोबत यावी यासाठी प्रयत्न केले. त्यांना ४ जागा द्यायची तयारी होती. मात्र आरएसएसवरील बंदी या मागणीमुळे बोलणी फिस्कटल्याचं भुजबळ यांनी म्हटलं. तसेच वंचित आघाडीला, काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीसोबत समझोता करण्यात रस नव्हता असं आमचं मत असल्याचं देखील भुजबळ यांनी म्हटलं आहे. नोटबंदी, जीएसटी, कर्जमाफी, शेतकरी विरोधी धोरणं यामुळं सरकार विरोधात रोष आहे. नाशिकचा विकास मागील साडेचार वर्षापासून थांबला आहे.

## चारित्र्याच्या संशयावरून भावाकडून बहिणीचा खून, बार्शीतील घटना

**बार्शी-** येथील पाटील चाळ येथे माहेरी राहणाऱ्या विवाहित बहिणीचा भावानेच चारित्र्यावर संशय घेऊन खून केल्याची बार्शी येथे घटना घडली. याप्रकरणी आईने मुलाविरोधात बार्शी पोलिसांत तक्रार दिली आहे. पूजा संदीप गायकवाड (२१, रा. वडगाव शेरी, पुणे, सध्या रा. बार्शी) असे मृत झालेल्या विवाहितेचे नाव आहे. याप्रकरणी मृत तरुणीचा भाऊ सोमनाथ बाळू ओहोळ याच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तीन वर्षांपूर्वी पूजा हिचा विवाह झाला होता. तिला दीड वर्षाचा मुलगा असून सहा महिन्यांपूर्वी सासरच्या लोकांनी मृत पूजाच्या चारित्र्यावर संशय घेतला होता. सासरी चांगली वागणूक मिळत नसल्याने पूजा मुलासह माहेरी राहत होती. सदरच्या प्रकारानंतर बहीण-भावांमध्ये सतत भांडणे होत असल्याचे समोर आले आहे.

## मनसे लोकसभा निवडणूक लढणार नाही!

**मुंबई-** राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने यंदाच्या लोकसभा निवडणुकीतून माघार घेतली आहे. तसं दोन ओळींचं प्रसिद्धीपत्रक पक्षाकडून आज जारी करण्यात आलं आहे. मनसेने गेल्या लोकसभा निवडणुकीतून माघार घेतली होती. त्यानंतर यंदा मनसे लोकसभा निवडणूक लढणार की नाही, याबाबत अनेक तर्कवितर्क लावले जात होते. या सर्वाला अखेर पूर्णविराम मिळाला असून मनसेने लोकसभा निवडणुकीतून माघार घेत असल्याची घोषणा आज केली. 'मनसे यंदाची लोकसभा निवडणूक लढविणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी' असे प्रसिद्धीपत्रक आज पक्षाचे नेते शिरीष सावंत यांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आले आहे. या पत्रात 'बाकी १९ मार्च २०१९ ला बोलूच' असेही पुढे नमूद करण्यात आले आहे.




आश्रय सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट

आश्रय सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट व सेव्हन हिल्स हॉस्पिटल अंधेरी यांच्या संयुक्त विद्यमानाने समाजातील व गरीब लोकांसाठी किडनी, कॅन्सर, हृदयरोग, ब्रेन आदी रोगांवर निःशुल्क शस्त्रक्रिया करुन देण्यात येईल. केवळ केसरी आणि पिवळे रेशनकार्डधारक असणाऱ्यांनाच या सेवेचा लाभ मिळेल.

संस्थापकः- श्री. दीपक मोरेश्वर नाईक, मो. ८४२४९८९८९८

email:deepakmnaik@gmail.com, manavadhikar@gmail.com, www.ashraytrust.com

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)